पुण्य नगरी

# गुरूकुल स्कूलमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती

सातारा/प्रतिनिधी

शाहुनगर येथील गुरूकुल स्कूलच्य विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षिततेची सामूहिक शपथ घेतली. सातारा येथील यशोदा टेक्निकल कॅम्पसच्या विद्यार्थ्यांनी गुरूकुल स्कूलमधील इयत्ता ५ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या प्रकल्पांतर्गत सामुहिक शपथ देत सायबर काईम अंतर्गत होणाऱ्या गुन्हयांची माहिती दिली.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे सायबर गुन्हेगारांच्या टोळ्या आता विद्यार्थ्यांना आपल्या जाळ्यात अडकवतायत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर गुन्हेगारीबाबत जनजागृती व्हावी, यासाठी यशोदा टेक्निकल कॅम्पस, सातारा व क्विक हिल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षेबाबत जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे.

यावेळी यशोदा कॅम्पस येथील आदित्य मेनकुदळे, अथर्व आहिरे, वैष्णवी देशमुख, स्नेहल पवार या विदयार्थ्यांनी गुरूकुलच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



गुरूकुल स्कूलमधील विद्यार्थ्यांना सामुहिक शपथ देत सायबर काईम अंतर्गत होणाऱ्या गुन्हयांची माहिती देताना मान्यवर

यावेळी मार्गदर्शन करताना ऑनलाईन गेमचं वाढलं प्रमाण लहान मुलं ऑनलाईन गेम खेळतात. त्या माध्यमातून माहिती गोळा केली जाते. डमी युजर्स क्रियेट केले जातात. यासाठी ऑनलाईन मोबाईल खेळताना कोणती काळजी घेण्यात यावी, मुळात ऑनलाईन गेम खेळूच नये. मोबाईल हाताळताना काय करावे आणि काय करू नये याचेही मार्गदर्शन करण्यात आले.

एखादा युजर्स आठव्या वर्गात असेल तर दुसरा मीही तुझ्याच वयाचा आहे. तुझे आई - वडील काय करतात. आर्थिक उत्पन्न काय आहे. तुमचे पालक परदेशात गेले होते का, कार कोणती आहे, अशी माहिती गोळा करण्यात येते व्हाट्सअपवर नंबर शेअर होतात. समोरच्या व्यक्तीकडून संपूर्ण माहिती घेतात. यामुळे गुन्हेगारी करण्यास मदत होते. हळूहळू वैयक्तिक माहिती घेतात. लहान मुलांना जाळ्यात ओढले जाते, अशा पध्दतीची माहिती यशोदा कॅम्पस येथील आदित्य मेनकुदळे, अथर्व आहिरे, वैष्णवी देशमुख, स्नेहल पवार यांनी विद्यार्थ्यांना दिली.

यावेळी गुरूकुल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र चोरगे, कु. ऐश्वर्या चोरगे, चि. अर्जुन चोरगे, माध्यामिक विभागाच्या मुख्याध्यापिका शीला वेल्हाळ, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अनुराधा कदम, माध्यमिक विभागाच्या उपमुख्याध्यापिका सोनाली तांबोळी, जनसंपर्क अधिकारी विश्वनाथ फरांदे, शिक्षक उपस्थित होते.